भटक्या कुत्र्यांचा वाढता उपद्रव जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोणाची?!.संपादकीय २ वर

सुवर्णसंधी सभासद अभियान
वाढदिवस तुमचा, शुभेच्छा आमच्या...
सा.प्रगत भारत वृत्तपत्रकाचे सभासद व्हा.मो.नं.९८६०८७७७८९

साप्ताहिक
Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbharat.com .मो. 9860877789
# प्रगत भारत

LAXMI JEWELLERS
अप्रतिम विश्वासाच अलिशान दालन..
सरकारमान्य सोने-चांदी दागिन्यांची खात्रीशीर जुनी पेढी
लक्ष्मी ज्वेलर्स

रूक्मिणी कॉम्पलेक्स,देहु-आळंदी रोड,टाळगाव चिखली,पुणे मो-९८९०१५४३५४

• वर्ष:१९ • अंक क्र.०९ • साप्ताहिक • मंगळवार दि. १८ ते २४ ऑगस्ट २०२६ • RNI/MAH/MRA/2008/25149 • RNP/पोस्ट-PCE/006/2024-26 • पृष्ठे-४ • किंमत:२.००

## चाकण एमआयडीसीतील रस्ते व पायाभूत सुविधांची उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली पाहणी



**पुणे:चाकण एमआयडीसीतील समस्यांकडे केवळ तात्पुरत्या उपाययोजनांच्या दृष्टीने न पाहता भविष्यातील औद्योगिक विस्तार,वाढती वाहतूक आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन अल्प, मध्यम आणि दीर्घकालीन एकात्मिक पायाभूत सुविधा विकासाचा आराखडा तयार करावा. रस्ते, वाहतूक, ड्रेनेज, वीज, पार्किंग, सार्वजनिक वाहतूक आणि अन्य नागरी सुविधांचा एकत्रित विचार करून कामे करावीत, असे उद्योगमंत्री श्री. उदय सामंत यांनी येथे सांगितले.**

चाकण एमआयडीसी परिसरातील रस्ते,वाहतूक कोंडी,पावसाच्या पाण्याचा निचरा, अतिक्रमणे, पार्किंग तसेच अन्य पायाभूत सुविधांच्या प्रश्नांची उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज प्रत्यक्ष पाहणी करून आढावा घेतला.पाहणीनंतर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी चाकण औद्योगिक वसाहतीतील विविध समस्या आणि त्यावर करावयाच्या कालबद्ध उपाययोजनांचे सविस्तर सादरीकरण केले. संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून तातडीच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात तसेच भविष्यातील औद्योगिक विस्तार आणि वाढती वाहतूक लक्षात घेऊन दीर्घकालीन व शाश्वत उपाययोजना कराव्यात,अशा सूचना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिल्या.

या पाहणीवेळी उद्योगमंत्री श्री.सामंत यांच्यासोबत उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी.अनबलगन,मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाह,पीएमआरडीएचे आयुक्त अभिजीत चौधरी,जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग,एमएसआरडीसी,एम आयडीसी,पोलीस व अन्य संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि चाकण एमआयडीसीतील उद्योजक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

उद्योगमंत्री श्री.सामंत यांनी चाकण एमआयडीसीतील प्रमुख व अंतर्गत रस्ते, महत्त्वाचे चौक,वाहतुकीच्या दृष्टीने संवेदनशील ठिकाणे,पावसाचे पाणी साचणारी ठिकाणे, नाले, अतिक्रमणे, पार्किंगची उपलब्धता तसेच वाहतूक व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली. रस्त्यांची सद्यस्थिती,वाढती वाहनांची वर्दळ आणि औद्योगिक क्षेत्रातील वाहतुकीवर होणारा परिणाम याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.पाहणीनंतर झालेल्या सादरीकरणात जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी चाकण औद्योगिक वसाहतीतील विविध समस्या तसेच त्यावर करण्यात येणाऱ्या शॉर्ट,मिड आणि लाँग टर्म स्वरूपाच्या उपाययोजनांची माहिती दिली. महामार्ग व अंतर्गत रस्ते, वाहतूक व्यवस्था,पावसाच्या पाण्याचा निचरा,वीज,वाहनतळ,अतिक्रमणे आणि नागरी सुविधांशी संबंधित प्रश्नांवर संबंधित विभागांकडून करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे सादरीकरण करण्यात आले.



**पुणे येथे-वंदेमातरम कृती समिती पुणे, यांच्या वतीने 'युथ की आवाज' यांनावाने आयोजन केले होते यामध्ये 'वंदे मातरम'च्या स्वरांनी पुण्यात जागवली राष्ट्रभक्तीची भावना'वंदे मातरम'च्या घोषणांनी आणि देशभक्तीपर गीतांच्या स्वरांनी पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसर राष्ट्रभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस.पुणे मनापच्या महापौर मंजुषा नागपुरे व पिंपरी चिंचवडचे महापौर रवि लांडगे,उपमहापौर परशुराम वाडेकर,भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण,पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे,पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष शत्रुध्न(बापू)काट,आमदार उमाताई खापरे,भाजयुमोचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.**

## सुनिल विजय गव्हाणे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या फ्रंटल व सर्व सेल प्रदेश समन्वयकपदी नियुक्ती



**मुंबई:राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी गेल्या सहा वर्षांपासून यशस्वीपणे सांभाळणारे सुनिल विजय गव्हाणे यांची आता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या फ्रंटल व सर्व सेल प्रदेश समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी नियुक्तीपत्राद्वारे ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे.विद्यार्थी चळवळीतून आपल्या राजकीय आणि सामाजिक कार्याची सुरुवात करणाऱ्या सुनिल गव्हाणे यांनी गेल्या सहा वर्षांत महाराष्ट्रातील विद्यार्थी प्रश्नांना सातत्याने वाचा फोडत राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसची संघटनात्मक बांधणी करण्यावर भर दिला.**

विद्यार्थी शुल्क,शिष्यवृत्ती,परीक्षा, प्रवेश प्रक्रिया,शिक्षणातील विविध

"राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षपदाची जबाबदारी माझ्यावर सोपवून आज सहा वर्षे पूर्ण झाली.या सहा वर्षांत अनेक राजकीय चढ-उतार आले,मात्र पक्षाच्या विचारांप्रती आणि संघटनेप्रती माझी निष्ठा कधीही ढळू दिली नाही. या काळात आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब,आदरणीय सुप्रियाताई सुळे यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन लाभले.आदरणीय जयंत पाटील साहेबांनी माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला घडवत महाराष्ट्र समजून घेण्याची आणि संघटनात्मक काम करण्याची संधी दिली.""आज पक्षाने माझ्यावर फ्रंटल व सर्व सेल प्रदेश समन्वयक म्हणून नवीन जबाबदारी सोपवली आहे. हा माझ्यासाठी सन्मान नसून आणखी मोठी जबाबदारी आहे. गेल्या सहा वर्षांत विद्यार्थी संघटनेत काम करताना मिळालेला अनुभव आणि महाराष्ट्रभर निर्माण झालेले कार्यकर्त्यांचे नेटवर्क याचा उपयोग पक्षाची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी करेन. आगामी काळात अधिक आक्रमकपणे आणि निष्ठेने काम करत पक्षाची विचारधारा महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील राहीन," असे गव्हाणे यांनी सांगितले.

## अभियंत्यांनी इतरांसाठी संधी आणि नोकऱ्या निर्माण करणारे उद्योग आणि संस्था स्थापन कराव्यात - राज्यपाल जिष्णु देव वर्मा



### सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभ उत्सवात संपन्न

**पुणे:सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाची भारताच्या आर्थिक वाढीत आणि राष्ट्रीय विकासात अर्थपूर्ण योगदान देतील अशा तंत्र उद्योजकांच्या आणि नवोन्मेषकांच्या नवीन पिढीसाठी दिशा देणारी संस्था बनण्याची क्षमता आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल आणि विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी केले.**

अभियंत्यांनी केवळ रोजगार शोधण्यापेक्षा इतरांसाठी संधी आणि नोकऱ्या निर्माण करतील अशी तंत्रज्ञान निर्मिती,उद्योग आणि संस्था स्थापन कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विद्यापीठाचे नियामक मंडळाचे अध्यक्ष विनायक पै,कुलगुरू प्रा. सुनील भिरुड,राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. दयाराम सोनवणे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. यशोधरा हरिभक्त आदी उपस्थित होते.सीओईपी ही संस्था जवळपास दोन शतकांपासून भारताचे भविष्य घडवत आहे, असे सांगून राज्यपाल पुढे म्हणाले, संस्थेचा वारसा केवळ शैक्षणिक उत्कृष्टतेवरच नाही,तर तिने घडवलेले अभियंते,उद्योजक, तंत्रज्ञ आणि राष्ट्रनिर्माते यांच्यावर उभा आहे.सीओईपीने केवळ तंत्रज्ञान संस्था न राहता तांत्रिक विचार, नवोपक्रम आणि समस्या सोडवण्याचे जागतिक केंद्र बनण्याची आकांक्षा बाळगली पाहिजे. स्वच्छ ऊर्जा,प्रदूषण,जल सुरक्षा, शाश्वत गतिशीलता,प्रगत उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सेमीकंडक्टर्स आणि हवामान बदल अशा विविध क्षेत्रांतील आव्हानांकडे केवळ आव्हाने म्हणून नव्हे,तर नवोपक्रम, संशोधन आणि परिवर्तनात्मक उपायांच्या संधी म्हणून पाहिले पाहिजे.

**सीओईपीच्या चिखली कॅम्पसमध्ये संशोधनाची एक स्वतंत्र व्यवस्था सुरू करण्यात येत आहे.** सरकार त्याला मोठे आर्थिक पाठबळ देणार असून सामाजिक उत्तरदायित्त्व निधीच्या माध्यमातूनही निधीची व्यवस्था करण्यात येत आहे,असेही ते म्हणाले.मंत्री पाटील यांनी व्यक्त केले. सीओईपीच्या कॅम्पसमध्ये मुलींसाठी वसतिगृहाची कमतरता जाणवल्यामुळे ४०० विद्यार्थीनी क्षमतेचे वसतिगृह तातडीने बांधण्यासाठी शासकीय निधीसह सीएसआरमधून बांधण्याची व्यवस्था करण्याची घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पाटील यांनी यावेळी केली. तसेच वसतिगृह शुल्क भरणे अडचणीचे असलेल्या ग्रामीण भागातील १० विद्यार्थिनींना दरमहा १० हजार रुपये याप्रमाणे १० महिन्याचे १ लाख रुपये देण्याची,आणि 'कमवा आणि शिका' अंतर्गत ५० विद्यार्थी, विद्यार्थीनींना खर्चासाठी महिन्याला २ हजार रुपये मिळतील, असे काम देण्याची आणि त्यासाठी दरमहा १ लाख रुपये देण्याची घोषणाही त्यांनी केली.

मंत्री पाटील पुढे म्हणाले, ज्यांना शिक्षण मिळत नाही ते लवकरात लवकर शिक्षणाच्या प्रवाहात यावेत म्हणून राज्य शासनाने दोन वर्षांपूर्वी ८ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या सर्व मुलींचे शिक्षण शुल्क,परीक्षा शुल्क माफीचा निर्णय घेतला.परिणामी दोन वर्षांपूर्वी मुले आणि मुली यांच्यामध्ये उच्च शिक्षणात असलेला १६ टक्क्यांचा फरक गेल्या वर्षी साडेतीन टक्क्यांवर आला असून यावर्षी बहुधा मुलींची संख्या मुलांपेक्षा जास्त होईल, असा प्राथमिक अंदाज असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा.भिरूड यांनी विद्यापीठाच्या प्रगतीविषयी माहिती दिली. आजच्या पदवीप्रदान समारंभात पदवीच्या ८८९ आणि पदव्युत्तर पदवीच्या ५८२ विद्यार्थ्यांना पदवी देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. पदवीच्या सुवर्णपदक प्राप्त आणि विषयांमध्ये पहिल्या आलेल्या १० विद्यार्थ्यांना तसेच पदव्युत्तर पदवीच्या सुवर्णपदक प्राप्त २५ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठाने अनेक नामवंत परदेशी विद्यापीठे व शिक्षणसंस्थांचे अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी करार केले आहेत. उद्योग आणि शिक्षणसंस्था यातील सहकार्याला गती संस्थेच्या चिखली येथील संशोधन केंद्रातून मिळणार आहे, असे त्यांनी सांगितले.

सा.प्रगत भारत
वृत्तपत्र १९ व्या वर्षात यशस्वी
पदार्पणा निमित्त व मा.श्री.विशाल वाकडकर यांची प्रदेशाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस(शरदचंद्र पवार पक्ष) नियुक्ती झाल्याबद्दल...हार्दिक शुभेच्छा..!.


*-शुभेच्छूक-*
मा.श्री.विशाल वाकडकर व समस्त मित्र मंडळ

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थिती 'वंदे मातरम'च्या स्वरांनी पुण्यात जागवली राष्ट्रभक्तीची भावना

## भाजयुमोचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांचा युवकांना राष्ट्रनिर्मितीचा संदेश



पिंपरी:-'वंदे मातरम'च्या घोषणांनी आणि देशभक्तीपर गीतांच्या स्वरांनी पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसर राष्ट्रभक्तीच्या वातावरणाने भारावून गेला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण ,पुणे मनापच्या महापौर मंजूषा नागपुर व पिंपरी चिंचवडचे महापौर रवि लांडगे,आमदार उमाताई खापरे तसेच आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते

'वंदे मातरम् कृती समिती, पुणे'च्या वतीने आयोजित 'यूथ की आवाज' या विशेष कार्यक्रमाला हजारो युवकांनी प्रतिसाद दिला. या कार्यक्रमात भाजयुमोचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी ही सहभाग घेत युवकांशी संवाद साधला. 'वंदे मातरम हे केवळ गीत नसून भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला ऊर्जा देणारे आणि देशवासीयांना एकत्र बांधणारे राष्ट्रचेतनेचे प्रतीक आहे, असे मोरे यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी युवकांनी केवळ घोषणा देऊन थांबू नये, तर सामाजिक आणि राष्ट्रीय जबाबदारी स्वीकारून विकसित भारताच्या उभारणीत सक्रिय योगदान द्यावे,''असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमानिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीतही मोरे सहभागी झाले.हातात तिरंगा आणि 'वंदे मातरम'च्या घोषणांसह युवकांनी परिसर दणाणून सोडला. समारोपावेळी हजारो युवकांनी मोबाईलच्या प्रकाशात एकत्रित 'वंदे मातरमचे गायन केले. देशभक्ती, राष्ट्रीय एकात्मता आणि युवकशक्तीचा प्रभावी संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.

# सा.प्रगत भारत वृत्तपत्रक संपादक दत्तात्रय कांबळे यांच्याकडून शहर अभियंता मनोज सेठिया यांचे अभिनंदन



**पिंपरी:** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागातील सह शहर अभियंता (स्थापत्य)मनोज मोतीलाल सेठिया यांना 'शहर अभियंता'पदावर सेवाज्येष्ठते नुसार तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात आली आहे.याबाबतचा आदेश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी जारी केला आहे.

महापालिका आस्थापनेवरील 'शहर अभियंता'पद दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी रिक्त झाले होते.सेठीया यांच्या नियुक्तीनंतर साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्रकाचे संपादक दत्तात्रय कांबळे यांनी त्यांच्या दालनामध्ये जाऊन सदिच्छा भेट घेऊन व साप्ताहिक प्रगत भारत वृत्तपत्र १९ व्या वर्षात यशस्वी पदापर्णा निमित्त विशेषांक त्यांना देण्यात आला.व त्यांना अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.

# भाजयुमोचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांचा कोकणस्थ कुंभार समाज,पिंपरी चिंचवड यांच्या वतीने सत्कार



**चिंचवड**-कोकणस्थ कुंभार समाज,पिंपरी चिंचवड पुणे यांच्या वतीने आचार्य अत्रे सभागृह, वल्लभनगर,पिंपरी येथे आयोजित कौटुंबिक स्नेहमेळावा व विद्यार्थी गुणगौरव संपन्न झाला.यावेळी भाजयुमोचे माजी प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांचा यावेळी जाहिर सत्कार कोकणस्थ कुंभार समाज,पिंपरी चिंचवड पुणे यांच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने करण्यात आला.यावेळी अनुप मोरे यांनी यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या यशाचे कौतुक करण्यात केले.समाजातील कुटुंबांना एकत्र आणणारा आणि विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद असल्याचे अनुप मोर यांनी यावेळी सांगितले.या सुंदर कार्यक्रमासाठी आवर्जून आमंत्रित केल्याबद्दल कोकणस्थ कुंभार समाजाच्या सर्व आयोजकांचे व पदाधिकाऱ्यांचे अनुप मोरे यांनी आभार मानले.

# करिअर मध्ये जबाबदारी आणि कर्तव्याचे भान ठेवा-वसंत नामा गवळी लिंगायत गवळी समाज गौरव राज्यस्तरीय पुरस्कार संपन्न



**पुणे**:-सोशल मीडियाच्या आभासी जगतामध्ये वावरताना, आ-पले करिअर घडत असताना नैतिक जबाबदारी आणि कर्तव्य देखील पार पाडण्याचे भान विद्यार्थ्यांनी ठेवावे. लिंगायत गवळी समाजातील तरुणाईचा उपयोग सक्षम, सुदृढ, सुसंस्कृत समाज उभारणीसाठी झाला पाहिजे. उच्च शिक्षण घेऊन पुढे गेलेल्या तरुणांनी आपल्या मागच्या पिढीला मार्ग दाखविला पाहिजे अशी अपेक्षा महाराष्ट्र गवळी समाज संघटनेचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष वसंत नामा गवळी यांनी व्यक्त केली. शनिवारी(दि.८)पिंपरी येथे लिंगायत गवळी विकास फाउंडेशन या संस्थेच्या वतीने लिंगायत गवळी समाजाचा ''समाज गौरव राज्यस्तरीय पुरस्कार २०२६'' सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमात १० वी आणि १२ वी मधील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच विठ्ठल हुच्चे, सोनाली डोईजड, प्रशांत काटकर, संतोष बारसे, भारवी चौधरी, रोशन लंगोटे, श्रुती चौधरी, ॲड. चैताली नामदे, ऋतुजा बहिरवाडे, जयकुमार बीडकर यांचा ''समाज गौरव पुरस्कार - २०२६'' देऊन आणि राजूभाऊ घुगरे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ माजी नगरसेवक नारायण बहिरवाडे, ग्लोबल टेकक्सीस इन्स्टिट्यूट चे संचालक प्रा.संभाजी बारसे,प्रा. भालचंद्र हुच्चे,खंडू बहिरवाडे, उमाकांत जोमीवाले,नगरसेविका अरुणाताई लंगोटे,गणेश लंगोटे, सुपाआप्पा पिरनाईक, डॉ. किसन झिपरे,प्रवीण हुंडीवाले, कृष्णा भाऊ गठरी,सुरेश शहापूरकर, बंटीभाऊ घुगरे, सोमनाथ हिरणवळे, भगवान औशीकर,दयानंद श्रीलिंग, राजेंद्र लगडे,भीमराव घुगरे,अशोक आप्पा बहिरवाडे, मधुकर औरंगे, लक्ष्मण बहिरवाडे,पंडित आप्पा शहापूरकर,विठ्ठल उन्हाळे आदी उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणत नारायण बहिरवाडे यांनी सांगितले की,नव्या पिढीने उच्च शिक्षण घेऊन उद्योग व्यवसायाच्या नव्या वाटा शोधल्या पाहिजेत. प्रास्ताविक करताना प्रा. संभाजी बारसे यांनी सांगितले की,व्यावसायिक शिक्षण घेऊन आर्थिक उन्नती लवकर होते. त्यासाठी विद्यार्थ्यांना दहावी,बारावीच्या टप्प्यामध्ये योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवायला हवे. यासाठी लिंगायत गवळी विकास फाउंडेशन या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करिअर घडवण्यासाठी मार्गदर्शन करण्यात येईल.कार्यक्रम आयोजनात प्रकाश चौधरी,वामन काटकर,मधुकर बिडकर, राजेश चौधरी आदींनी सहभाग घेतला होता. स्वागत, प्रास्ताविक प्रा. संभाजी बारसे, सूत्र संचालन मयुरी परब आणि आभार मधुकर बिडकर यांनी मानले.




